**नि.दि.दा.क. १२५/२०१२**

श्री. राहुल सुरेंद्र कामत ... **वादी**
विरुध्द
श्री. सुरेंद्र मेघराज परमार वगैरे ... **प्रतिवादी**

**<u>आदेश निशाणी ८६ वर</u>**
( घोषित दिनांक १२/०९/२०१७)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

०२. अर्जातील कथनाप्रमाणे, वादींनी दाव्याचे मुल्यांकन मा.सर्वोच्च न्यायालय २०१० एसएआर(सिव्हील) ४०२ या न्यायनिवाडयाप्रमाणे केलेले होते. परंतु, मा.मुंबई उच्च न्यायालयाने न्यायनिवाडा २०१५(२) एम.एच.एल.जे.४७२ मध्ये दिल्याप्रमाणे वर नमूद मा. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिवाडा महाराष्ट्र राज्याला लागू होत नाही. त्यामुळे दाव्याचे मुल्यांकनाचे कलमात दुरुस्ती करण्यासाठी वादींनी मागणी केली आहे.

०३. प्रतिवादीतर्फे या अर्जाला म्हणणे दाखल केलेले नाही.

०४. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

०५. वादींतर्फे त्यांच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने, ***<u>सुहरिद सिंग उर्फ सरदूलसिंग विरुध्द रणधिर सिंग आणि इतर, २०१० एसएआर (सिव्हील) ४०२</u>*** या मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाडयाची प्रत दाखल केलेली आहे. त्यातील विवेचनाप्रमाणे पक्षकारांनी हस्तांरण दस्त रद्द करण्यासाठी दाव्यात मागणी केली असल्यास व या हस्तांतरण दस्ताला तो पक्षकार नसल्यास पंजाब कोर्ट फी ॲक्ट प्रमाणे त्याचे मुल्यांकन दस्तातील नमुद रक्कमेवर करण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार वादीने

प्रस्तुत दाव्याचे मुल्यांकन करुन त्यात जाहीर ठराव करुन मागितलेल्या हस्तांतरणाच्या दस्ताला तो पक्षकार नसल्याने बॉम्बे कोर्ट फी ॲक्टचे कलम ६(iv)(j) नुसार रुपये १,०००/- ची आकरणी करुन त्याप्रमाणे न्यायालयीन शुल्क दिलेले आहे.

०६. परंतु, दावा दाखल झाल्यानंतर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या ***प्रिझम रियल्टी, पुणे विरुध्द गोविंद यशवंत खलाडे आणि इतर, प्रकाशित २०१५(२)एमएच.एल.जे.४७२*** मधील न्यायनिर्णयानुसार वर नमूद मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिवाडा हा पंजाब कोर्ट फी ॲक्टच्या तरतुदीनुसार दिला असून सदरची तरतुद बॉम्बे कोर्ट फी ॲक्टच्या कलम ६(iv)(ha) तरतुदीशी सुसंगत नसल्याने वर नमुद मा. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिवाडा महाराष्ट्र राज्याला लागू होत नाही असा निष्कर्ष नोंदविला आहे. त्यामुळे मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार यातील वादीने हस्तांतरणाचा दस्त रद्द करुन मागितला असल्याने बॉम्बे कोर्ट फी ॲक्टचे कलम ६(iv)(j) नुसार ad volerem रक्कमेच्या अर्धी रक्कम त्याला न्यायालयीन शुल्क म्हणून दयावे लागते.

०७. प्रतिवादीतर्फे वकीलांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये हा अर्ज चालू शकत नाही असे कथन केले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, बॉम्बे कोर्ट फी ॲक्टचे तरतुदीप्रमाणे वादीने त्याची आकारणी करणे आवश्यक असून इतर कायद्याच्या तरतुदीप्रमाणे दावा आकारणी करता येणार नाही. त्यामुळे हा अर्ज विलंबाने दाखल केला असल्याने तो नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

०८. वादीतर्फे वकिलांनी त्यांच्या युक्तिवादात ***माऊंट मेरी इंटरप्रायझेस विरुध्द जिवरत्न मेडी ट्रीट प्रायव्हेट लिमिटेड, २०१५ डीजीएलएस(एससी)११३*** या न्यायनिवाडयावर भिस्त ठेवली असून

त्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ वरील अर्जाचा विचार करतांना वादीने यापूर्वी दाव्याचे मुल्यांकन कमी केले असल्यामुळे व दुरुस्तीच्या अर्जाने तो सदरचे मुल्यांकन दुरुस्त करु इच्छित असल्याने असा अर्ज मंजूर करणे योग्य आहे असे विवेचन केले आहे. प्रस्तुतचा अर्ज वाद मुद्दे निश्चित केल्यानंतर दाखल केलेला आहे. परंतु, याकामी अद्याप उभयपक्षकारांचा पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे हा अर्ज न्यायचौकशीपूर्वी दाखल केला असून दोन्ही पक्षकारांना समान संधी उपलब्ध आहे.

०९. जरी, वादीने दाव्याची आकारणी यापूर्वी कमी केली असली तरी सद्यपरिस्थितीत, वादीने दावा दुरुस्ती करुन बॉम्बे कोर्ट फी ॲक्टचे तरतुदीनुसार योग्य न्यायालयीन शुल्क भरण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. प्रतिवादीतर्फे यास हरकत असल्यास त्याचा विचार अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळी करता येईल. त्यामुळे वादीने या अर्जात नमूद केलेली मागणी ही आवश्यक असून या दुरुस्तीने प्रतिवादीला कोणतेही नुकसान होणार नाही. करिता आदेश -

**आदेश**

१. अर्ज मंजूर.

२. वादीने अर्जात सुचवलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्त दावा प्रत सादर करावी.

कर्जत

दिनांक : १२/०९/२०१७

सही/-

( श्र.जि. डोलारे )

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत

जिल्हा-रायगड.